# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३३/का-
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक- २३ डिसेंबर, २००४.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील मतदार यादी

महोदय,

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार मतदार यादी तयार करणे व मुख्य तयार करणे ही निरंतर प्रक्रिया आहे. असे असताना देखील सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील सर्व स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोग जी अधिसूचित करील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी उपलब्ध करून देत मतदार नोंदणी अधिकारी विधानसभा मतदार संघ मतदार यादी ही ज्या दिनांकास अंतिमरित्या प्रसि असेल तीच उपलब्ध करुन देतात व यानंतर कोणतीही पुरवणी यादी प्रसिध्द झाली नाही, असे प्रमाणप

२. राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे यासंबंधी लोकप्र अधिनियम, १९५०, अनुसार कार्यवाही करावी व राज्य निवडणूक आयोग जी तारीख निश्चित क तारखेपर्यंत अद्ययावत केलेली यादी उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक यांच्याकडे याबाबतचा पाठपुरावा सातत्याने केला असून, उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सर्व जिल्हाधिकारी व सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांना पत्र इएलआर-१००४/प्र.क्र.५६५/०४/३३, दिनांक- ८ डिसेंबर, २००४ अन्वये योग्य त्या सूचना निर्गमि आहेत. त्या पत्रांची एक प्रत आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे. यापुढे या पत्रात नमूद केल राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेपर्यंतची अद्ययावत मतदार यादी स्थानिक संस्थांच्या निवडणुकांसाठी प्राप्त करुन घ्यावी, ही विनंती.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( महेन्द्र ब. वारभुवन )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

\Me-inode\Documents and Settings\PATIL\My Documents\cab25.doc

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,
*सर्व विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी
*सर्व विधानसभा मतदार संघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी
(* जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे मार्फत)

क्रमांक: ईएलआर–१००४/प्र.क्र. ५६५/०४/३३,

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ८ डिसेंबर २००४

विषय :– स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी मतदार यादी

महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार राज्य निवडणूक आयोग जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीवरुन स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीसाठी प्रभाग निहाय मतदार यादी तयार करावी लागते. तथापि, या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, सर्वसाधारणपणे विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी ही ज्या दिनांकास अंतिमरित्या प्रसिध्द झालेली असेल तीच मतदारयादी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन दिली जाते व " यानंतर कोणतीही पुरवणी यादी प्रसिध्द झाली नाही" असे प्रमाणपत्र देण्यात येते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी विधानसभा मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून अद्ययावत मतदार याद्या उपलब्ध करुन देण्यात येत नसल्यामुळे मतदार यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रयोजनासाठी ज्या दिनांकास अस्तित्वात असलेली मतदार यादी उपयोगात आणावयाचे अधिसूचित करेल त्या दिनांकापर्यंत मतदार यादीमध्ये पात्र मतदारांची नांवे मतदार यादीमध्ये अंतर्भूत न केल्यामुळे असे मतदार हे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीमध्ये मतदानापासून वंचित राहतात.

२. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील तरतूदीनुसार विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी ही भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या अर्हता दिनांक धरुन तयार केली जाते व त्यामध्ये सुधारणा केल्या जातात. भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादी तयार करुन ती अंतिमरित्या प्रसिध्द केल्यानंतर अशी मतदार यादी ही

उपरोक्त अधिनियमाच्या कलम २१(१) मधील तरतूदीनुसार अंमलात येते. अंतिमरित्या प्रसिध्द झालेल्या मतदार यादीमध्ये जर एखाद्या पात्र मतदाराचे नांव अंतर्भूत करावयाचे राहून गेले असल्यास किंवा मतदार यादीतील एखादी नोंद ही चुकीची किंवा सदोष असल्यामुळे दुरुस्त करावयाची असल्यास, मतदार संघातील एखाद्या संबंधीत व्यक्तीने मतदार संघातील तिचे सर्वसाधारण वास्तव्याचे ठिकाण स्थलांतरण केल्यामुळे तिच्या नांवाची नोंद ही मतदार यादीमध्ये स्थानांतर करावयाची असल्यास आणि एखादा मतदार हा मृत्यु पावल्यामुळे अथवा मतदारसंघातील सर्वसाधारण रहिवासी राहिला नसल्यामुळे अशा मतदारांच्या नांवाच्या नोंदी वगळणे आवश्यक असल्यास तर संबंधीत मतदार नोंदणी अधिकारी हा उक्त अधिनियमातील कलम २२ व २३ मधील तरतूदीनुसार मतदार यादीमध्ये यथास्थित नवीन नांव नोंदवणे, वगळणे अथवा त्यामध्ये सुधारणा करणे या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करु शकतो. मात्र अशी कार्यवाही ही त्या मतदार संघासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणूकांसाठी नामनिर्देशनपत्रे दाखल करावयाच्या शेवटच्या दिनांकापासून ते निवडणूकीची प्रक्रिया संपेपर्यंतच्या कालावधीत करता येत नाही.

३. अधिनियमातील ही तरतूद लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी अंतिमरित्या प्रसिध्द केलेल्या मतदार यादीबरोबरच मतदार नोंदणी अधिकाऱ्याने मतदार यादी अंतिमरित्या प्रसिध्द केल्यानंतर प्राप्त झालेले दावे व हरकती निकाली काढल्यानंतर निरंतर पुनरिक्षण प्रक्रिये अंतर्गत तयार करण्यात आलेली व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मागणी केलेल्या दिनांकापर्यंत अद्ययावत केलेली पुरवणी यादी ही उपलब्ध करुन देण्यात यावी अशा सूचना सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात याव्यात, ही विनंती.

४. कृपया या पत्राची पोच द्यावी.

(के. व्ही. कुर्डदकर)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.